**ठळक बातम्या**

- गदारोळामुळे आजही लोकसभेचं कामकाज ३ पर्यंत तर राज्यसभेचं दिवसभरासाठी तहकूब
- उत्तराखंडमध्ये बचाव कार्य प्रगतीपथावर, २ मृतदेह सापडले, ३७२ जणांची सुखरुप सुटका
- अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतलेले निर्णय भारत-अमेरिका संबंध धोक्यात आणतील असा डेमोक्रेटिक पक्षाच्या सदस्यांचा इशारा

**आणि**

- गाझा शहराचा ताबा घेण्याच्या नेतान्याहूंच्या प्रस्तावाला इस्त्राइलच्या संरक्षण मंत्रिमंडळाची मंजुरी

**<><><><>**

भारत छोडो आंदोलनातल्या स्वातंत्र्यसैनिकांना आज संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे आदरांजली वाहण्यात आली. महात्मा गांधींनी पुकारलेल्या या आंदोलनाला उद्या ८३ वर्ष होत असून देशाच्या अविरत स्वातंत्र्यलढ्याचा हा निर्णायक टप्पा होता असं राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश यांनी सांगितलं. बिहारमधलं मतदारयाद्यांचं पुनरिक्षण आणि इतर विविध मुद्द्यांवर विविध पक्षांकडून आलेले २० स्थगन प्रस्ताव त्यांनी फेटाळले. त्याच्या निषेधात सदस्यांनी घोषणाबाजी सुरू केली. या अधिवेशनात व्यत्यय आल्यानं राज्यसभेच्या कामकाजाचे ५६ तास वाया गेले असल्याचं हरिवंश यांनी सांगितलं. गदारोळामुळे सभागृहाचं कामकाज त्यांनी आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित केलं.

लोकसभेत माजी सदस्य सत्यपाल मलिक यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करुन आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर सभापती ओम बिरला यांनी प्रश्नोत्तराचा तास घेण्याचा प्रयत्न केला. मात्र मतदार याद्या पुनरिक्षणावर चर्चेची मागणी करत विरोधी पक्ष सदस्यांनी प्रचंड गदारोळ केला. सभापतींनी आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर ३ वाजेपर्यंत कामकाज तहकूब केलं.

**<><><><>**

खतांची तस्करी आणि साठेबाजी रोखण्यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध असल्याची ग्वाही आज  रसायने आणि खत मंत्री जे पी नड्डा यांनी  लोकसभेत दिली. प्रश्नोत्तराच्या तासात पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. खतांना जीवनावश्यक वस्तूंचा दर्जा कायद्यानं दिलेला असून राज्य सरकारांना त्याअंतर्गत काळाबाजार रोखण्यासाठी पुरेसे अधिकार दिल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><>

राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत राज्यांना पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी आर्थिक आणि तांत्रिक मदत दिली जात आहे, असं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी सांगितलं. लोकसभेत शून्य प्रहरात पुरवणी प्रश्नाला त्या उत्तर देत होत्या.

<><><><>

अत्यावश्यक वापराची ४ औषधं आणि ३७ औषध फॉर्मुलेशनच्या कमाल किंमतीवर मर्यादा आणण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. संसर्ग, हृदयरोग, मधुमेह यावरच्या औषधांचा यात समावेश आहे. ब्रँडेड किंवा जेनरिक औषध विक्रेत्यांनी कमाल किमतीची मर्यादा ओलांडू नये असं राष्ट्रीय औषध मूल्य प्राधीकरणानं म्हटलं आहे. मात्र ज्यांच्या किमती कमाल किमतीपेक्षा कमी आहेत त्यांनी सध्याची किंमत कायम ठेवावी असं त्यांनी सांगितलं.

<><><><>

उत्तराखंडमधे उत्तरकाशी इथं ढगफुटी आणि मुसळधार पावसामुळे दरडी कोसळून झालेल्या दुर्घटनेत बचावकार्य युद्धपातळीवर सुरु आहे. वातावरण निवळल्यावर अडकलेल्यांना लवकरात लवकर बाहेर काढलं जाईल, असं सरकारनं म्हटलं आहे. आतापर्यंत ३७२ जणांना सुरक्षित बाहेर काढून आयटीबीपी कँपमधे हलवण्यात आलं आले. आतापर्यंत दोन मृतदेह सापडले असून ९ जवानांसह १६ जण बेपत्ता असल्याची माहिती राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं दिली आहे.

आपदग्रस्तांना बाहेर काढण्यासाठी यासाठी चिनुक आणि एम आय १७ विमानांची मदत घेतली जात आहे. अडकलेल्या लोकांसाठी पिण्याचं पाणी, औषधं आणि अन्नधान्य हेलिकॉप्टरद्वारे पोहोचवलं जात असल्याचं उत्तरकाशीच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी सांगितलं.

पुरात ज्यांच्या इमारतींचं नुकसान झालं आहे त्यांच्यासाठी सामुदायिक स्वयंपाकघरांची व्यवस्था केल्याचंही ते म्हणाले.

उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी काल रात्री आपत्ती नियंत्रण कक्षातून मदत आणि बचावकार्याचा आढावा घेतला.

दरम्यान, चमोली जिल्ह्यात पिपलकुटीजवळ दरड कोसळल्यानं बद्रीनाथ आणि हेमकुंड साहीब यात्रा स्थगित करायचा निर्णय प्रशासनानं घेतला आहे.

<><><><>

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतलेले निर्णय भारत-अमेरिका संबंधांना धोक्यात आणतील, असा इशारा अमेरिकेच्या संसदेतल्या परराष्ट्र विषयक समितीच्या डेमोक्रेटिक पक्षाच्या सदस्यांनी  दिला आहे. ट्रम्प यांना कुठल्याही मुद्द्यावर काळजी वाटत असेल तर त्यांनी ती सन्मानपूर्वक पद्धतीनं हाताळावी असा सल्ला खासदार ग्रेगोरी मीक्स यांनी दिला आहे.

<><><><>

ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष लुइझ इनसिओ लुला द सिल्वा यांनी काल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवरुन चर्चा केल्याची माहिती प्रधानमंत्री कार्यालयानं दिली आहे. या चर्चेत दोन्ही नेत्यांनी व्यापार, तंत्रज्ञान, उर्जा, संरक्षण, कृषी, आरोग्य आणि नागरी संबंध या क्षेत्रातलं सहकार्य वाढवण्यासाठी सहमती दर्शवली. क्षेत्रीय आणि जागतिक घडामोडींबाबतही त्यांनी चर्चा केली.

<><><><>

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित दोवाल यांनी काल रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्याशी चर्चा केली. लवकरच पुतीन भारतभेटीवर येतील असं त्यांनी सांगितलं. तत्पूर्वी दोवाल यांनी रशियन सुरक्षा परिषदेचे सचिव सर्जेइ शोइगु यांची भेट घेतली.

<><><><>

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन, हे युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांना भेटायला तयार नसले, तरीही पुतीन यांना भेटण्याची तयारी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी दर्शवली आहे. पुतीन, झेलेन्स्की आणि ट्रंप अशी त्रिपक्षीय बैठक घ्यावी असं अमेरिकेचे राजदूत स्टीव्ह विटकॉफ यांनी गेल्या बुधवारी पुतीन यांना सुचवलं होतं. त्यानंतर पुतीन

यांनी ट्रंप यांची भेट घ्यायला होकार दिला असून ही बैठक संयुक्त अरब अमिरातीत घ्यावी असं सुचवलं आहे. ही भेट पुढच्या आठवड्यात होऊ शकते असं रशियाचे सल्लागार युरी उशाकोव्ह यांनी सांगितलं, तर त्याबाबत अमेरिका अद्याप तपशील तपासत असल्याचं व्हाईट हाऊसच्या प्रसिद्धी मंत्री कॅरोलिन लीव्हीट यांनी सांगितलं.

दरम्यान युद्ध थांबवण्यासाठी अमेरिकेने रशियाला दिलेली मुदत आज संपत आहे.

<><><><>

इस्राएलच्या संरक्षण मंत्रालयाने गाझा शहराचा ताबा घेण्याचा प्रधानमंत्री बिन्यामिन नेतान्याहू यांचा प्रस्ताव मंजूर केला आहे. युद्ध थांबवण्यासाठी ५ कलमी कार्यक्रम या प्रस्तावात मांडला आहे. हमासचं पूर्ण निरस्त्रीकरण, गाझातलं सैन्य बाद करणं, सर्व ओलिसांची सुटका, गाझावर इस्राएलचं संपूर्ण लष्करी नियंत्रण आणि हमास किंवा पॅलेस्टीनचं काहीही नियंत्रण नसलेली नागरी प्रशासन व्यवस्था उभारणं या कलमांचा त्यात समावेश आहे.

इस्राएली सैन्य गाझाचा ताबा घेण्याच्या तयारीत असून, युद्धभूमीबाहेर नागरिकांना मानवतावादी सहाय्य पुरवत राहील.

दरम्यान, संरक्षण मंत्रालयाची बैठक सुरु असताना या निर्णयाच्या विरोधात पूर्ण इस्राएलमधे मोठ्या प्रमाणात निदर्शनं होत आहेत. गाझात हमासच्या कैदेत असलेल्या ओलिसांचे कुटुंबीयदेखील या निदर्शनांमधे सहभागी झाले असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. ओलिसांना सुखरुप परत आणण्यासाठी समझोता करावा अशी त्यांची मागणी आहे.

<><><><>

इस्राएलचे प्रधानमंत्री बिन्यामिन नेतान्याहू यांनी भारताचे राजदूत जे पी सिंग यांना भेटून धोरणात्मक भागीदारीविषयी चर्चा केली. भारत इस्राएल दरम्यान संरक्षण आणि आर्थिक क्षेत्रात सहकार्य वाढवण्याबाबत चर्चा झाल्याचं नेतान्याहू यांनी समाजमाध्यमांवर लिहीलं आहे. त्यानंतर नेतान्याहू यांनी ज्येष्ठ भारतीय पत्रकारांशी संवाद साधला, त्यात स्थानिक घडामोडी आणि भारताबरोबरचे संबंध याबाबतच्या प्रश्नांना सविस्तर उत्तरं दिली. जेपी सिंग यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वतीनं नेतान्याहू यांना शुभेच्छा दिल्या आणि द्विपक्षीय संबंध सकारात्मक दिशेनं पुढे नेण्याचं आश्वासन दिलं.

**<><><><>**

मुंबईत १८ व्या आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र आणि खगोल भौतिक शास्त्र ऑलिम्पियाड ११ ते २१ ऑगस्टदरम्यान होणार आहे. त्यात सर्व खंडातल्या ६४ देशातले ३०० खगोलशास्त्रज्ञ सहभागी होतील. होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्रानं ही स्पर्धा आयोजित केली आहे.

**//<><><><>//**